## शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२३-२४

(मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका क्षेत्रांसाठी)

# CAP प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

विशेष फेरी - 1 (केंद्रीय प्रवेशाच्या CAP जागांसाठी) https://11thadmission.org.in

| क्र | दिनांक व वेळ | केंद्रीय प्रवेश कार्यवाहीचा तपशील | |
|---|---|---|---|
| ० | दि.१६-०७-२०२३ | उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोटांतर्गत रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करण्यासाठी वेळ.<br>(व्यवस्थापन कोटा, इनहाऊस कोटा तसेच अल्पसंख्याक कोटा) | |
| १ | दि.१७-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२०-०७-२०२३,<br>रात्री.१०:००वा पर्यंत | • प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे, म्हणजे विशेष फेरी-१ साठी पसंती अर्ज भाग-२ ऑनलाईन सादर करणे. (विद्यार्थ्यांना भाग-२ मध्ये किमान एक व कमाल १० पसंतीक्रम / विद्यालये नोंदविता येतील)<br>• नवीन विद्यार्थी ऑनलाईन नोंदणी करून अर्ज भाग-१ भरून तो प्रमाणित करून घेऊ शकतात.<br>• विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज भाग-१ मध्ये दुरुस्ती करता येईल. (विद्यार्थ्यांनी आपला अर्ज वेळेत लॉक करावा)<br>टीप१- केवळ भाग-१ पडताळणी झालेले विद्यार्थी भाग-२ भरू शकतात.<br>टीप२-फक्त पसंतीक्रम भाग-२ लॉक असलेले अर्ज अलॉटमेंटसाठी विचारात घेतले जातील.<br><br>**संमती देणे बंधनकारक**<br>• या फेरीपूर्वी सर्वांचे पसंतीक्रम अर्ज भाग-२ अनलॉक केले जातील, जे विद्यार्थी या विशेष फेरीमध्ये सहभागी होऊ इच्छितात त्यांनी आपला पसंती अर्ज पुन्हा लॉक करणे बंधनकारक आहे. अर्थात प्रत्येक विद्यार्थ्यास ऑनलाईन संमती द्यावी लागेल.<br>• सदर प्रवेश फेरीपासून पुढील प्रत्येक फेरीसाठी विद्यार्थ्यांना पसंतीक्रम देऊन अर्ज भाग-२ लॉक करणे आवश्यक असेल त्यांचे मागील फेरीचे पसंतीक्रम कायम राहणार नाहीत.<br>• नियमित फेऱ्यांमध्ये प्रतिबंधित झालेले सर्व विद्यार्थी या फेरीमध्ये सहभागी होऊ शकतात. विशेष फेरीपासून पुढे कोणत्याही विद्यार्थ्यास प्रतिबंधित केले जाणार नाही<br><br>• कोटा प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी, ऑनलाईन कोटा प्रवेश पसंती नोंदवू शकतात. (Apply for Quota)<br>• मागील फेऱ्यांमध्ये प्रवेश झालेले विद्यार्थी, द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाईन पसंती नोंदवू शकतात. (Apply for Bifocal)<br>(कोटा तसेच द्विलक्षी प्रवेशासाठीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे देण्यात आलेले आहे) | अर्ज सादर करणे |
| | | | |
| ४ | दि.२१-०७-२०२३ ते<br>दि.२३-०७-२०२३ | **DATA PROCESSING** (back-end activities)<br>पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करणे तसेच विभागीय CAP समित्यांकडून Allotment चे पूर्व परीक्षण. | |
| ५ | दि.२४-०७-२०२३,<br>स. १०:००वा. | १. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालय निवड यादी / तपशील पोर्टलवर प्रदर्शित करणे.<br>२. विद्यार्थी लॉगीन मध्ये त्याला प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविणे.<br>३. संबंधित विद्यालयास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज लॉगीन मध्ये दर्शविणे.<br>४. फेरीचे कट-ऑफ पोर्टलवर दर्शविणे. (विद्यार्थ्यांना संक्षिप्त संदेश/SMS देणे) | |
| | | | |
| ६ | दि.२४-०७-२०२३,<br>स.१०:००वा पासून<br>दि.२७-०७-२०२३,<br>सायं.०६:००वा पर्यंत | • कॉलेज लॉगीन मध्ये प्रवेश ऑनलाईन निश्चित करणे, प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारणे या प्रक्रिया सुरु राहतील.<br>• अलॉट झालेल्या उमावि/कमवि मध्ये आपला प्रवेश निश्चित करणे, (प्रवेशास जाण्यापूर्वी आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे).<br>• अलॉट झालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास, प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करुन आपला प्रवेश तेथे निश्चित करावा (वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या वेळेत)<br><br>टीपा : -<br>• जर विद्यार्थ्याला मिळालेल्या विद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल तर विद्यार्थी लॉगिनमध्ये (Proceed for Admission) क्लिक करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत आणि अलॉट झालेल्या विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा.<br><br>• प्रथम पसंतीक्रम मिळूनही प्रवेश घेतला नाही किंवा प्रवेश नाकारला गेला अथवा प्रवेश रद्द केल्यास अशा विद्यार्थ्यांना यापुढील कोणत्याही फेरीमध्ये प्रतिबंधित केले जाणार नाही.<br>• तथापि, विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश लवकरात लवकर निश्चित करणे हिताचे आहे.<br><br>• पुढील फेरीसाठी नवीन विद्यार्थी नोंदणी आणि अर्ज भाग-१ भरणे सुरू राहील. (या कालावधीत फॉर्म भाग-१ मध्ये अनलॉक / दुरुस्ती करता येणार नाही)<br>• कोटांतर्गत प्रवेश तसेच द्विलक्षी विषयांसाठीचे प्रवेशाबाबत स्वतंत्र वेळापत्रकात दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. | प्रवेश निश्चित करणे |
| ७ | दि.२७-०७-२०२३,<br>रात्री.०८:०० वा पर्यंत | प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पोर्टलवर ऑनलाईन नोंदविणेसाठी उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी वेळ. (रात्री ०८:०० वा. पर्यंत)<br>उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी कोट्यातील रिक्त जागा CAP कडे प्रत्यार्पित करण्यासाठी वेळ. (व्यवस्थापन आणि इनहाऊस कोटा) | |
| | | फेरी अखेरची रिक्त जागा जाहीर करणे. | |

सूचना-

१. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व घटकांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार वेळेत सर्व प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य राहील.

२. विशेष फेरीपासून वैधानिक आरक्षण प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यात येतील.

३. याफेरीनंतरही काही विद्यार्थी प्रवेश घेऊ शकले नाहीत तर त्यांचे प्रवेशासाठी कार्यवाहीचे वेळापत्रक नंतर घोषित केले जाईल.

पुणे,
दिनांक-१४/०७/२०२३

14/7

शिक्षण सहसंचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)